पिकावरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प
कीटकशास्त्र विभाग वनामकृवि, परभणी
इ-मेल- cntomkv@gmail.com

जा.क्र. जिझेडई/क्रॉपसॅप/५८५/२६ दिनांक: २८.१०.२०२६

# आवाहन क्र. १६

## रब्बी मका व ज्वारी पिकावरील अमेरिकन लष्कर अळीचे व्यवस्थापन

**डॉ. अनंत लाड**
सहाय्यक प्राध्यापक

**डॉ. पुरुषोत्तम नेहरकर**
विभाग प्रमुख

**डॉ. राजरतन खंदारे**
संशोधन सहयोगी

मराठवाडा विभागात ज्या भागात रब्बी मका व ज्वारी पिकाची पेरणी झाली आहे, अश्या ठिकाणी या पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा (Fall Armyworm) प्रादुर्भाव दिसून येऊ शकतो. ही कीड कमी कालावधीत पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करू शकते. त्यामुळे पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेपासूनच कीड व्यवस्थापनाच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. या किडीचा प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी नियमित पीक निरीक्षण करून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा.

**नुकसानीचा प्रकार:** हि बहुभक्षी कीड असून जवळपास १८६ वनस्पतीवर उपजिविका करते. रोपावस्थेत पहिल्या दोन अवस्थेतील अळया पानाचा हिरवा भाग खरवडून खातात त्यामुळे पानावर पांढरे चटटे दिसतात. नंतरच्या अवस्थेतील अळया पोंग्यामध्ये प्रवेश करुन पाने खाण्यास सुरवात करतात. त्यामुळे पाने कुरतडल्यासारखी दिसतात. अळी पानाच्या खाली चिकट धाग्याच्या साहयाने लोंबकळते व वा-याने उडून नजिकच्या झाडावर पोहोचते त्याच "Balloning" असे म्हणतात. पानांना छिद्रे व पोंग्यामध्ये अळीची विष्ठा ही चिन्हे या अळीच्या प्रादुर्भावाची आहेत. तुरा व कणीस भरण्याच्या अवस्थेत अधिक आथीर्क नुकसान होते. अळी कणसात दाण्यांवर उपजीविका करते. या किडीच्या प्रादुर्भावामुळे जवळपास ३० ते ६० टक्क्यापर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.

**आर्थिक नुकसानीची पातळी:**

| पिकाची अवस्था व कालावधी | आर्थिक नुकसानीची पातळी |
|---|---|
| रोपावस्था ते सुरुवातीची पोंग्याची अवस्था (उगवणीनंतर ३ ते ४ आठवडे) | ५% प्रादुर्भावग्रस्त झाडे |
| मध्यम पोंग्याची अवस्था (५ ते ६ आठवडे) | १०% प्रादुर्भावग्रस्त झाडे |
| शेवटची पोंग्याची अवस्था (७ आठवडे) | २०% प्रादुर्भावग्रस्त झाडे |
| तुऱ्याची अवस्था व त्यानंतर (८ आठवड्यानंतर) | फवारणी टाळावी. पण १०% प्रादुर्भावग्रस्त कणसे असल्यास फवारणी करावी. |

**एकात्मिक व्यवस्थापन :**

- अंडीपुंज, समुहातील लहान अळया तसेच मोठया अळया हाताने वेचून नष्ट कराव्यात.
- मित्र कीटकांचे संवर्धन करावे.
- पीक ३० दिवसापर्यंतचे असल्यास बारीक वाळू किंवा बारीक वाळू व चून्याचे ९:१ प्रमाण करून पोंग्यात टाकावे.
- सर्वेक्षनासाठी एकरी २ ते ३ व सामुहीकरित्या मोठया प्रमाणात नर पतंग आकर्षित करून पकडण्यासाठी एकरी ८ ते १० कामगंध सापळे पिकाच्या वर एक फूट उंचीवर लावावेत, तसेच एकरी १० पक्षी थांबे उभारावेत.
- ट्रायकोग्रामा प्रीटीओसम किंवा टिलेनोमस रेमस यांची परोपजीवीग्रस्त ५०,००० अंडी प्रती एकर एक आठवडयाच्या अंतराने ३ वेळा सोडावे.
- मेटा-हायझीयम/नोमोरीया रिलाई ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- निंबोळी अर्काची @ ५ टक्के किंवा ॲझाडिरॅक्टीन १५०० पीपीएम ५ मिली प्रति लिटर पाण्यातुन फवारणी करावी.
- या किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास प्रति लिटर पाण्यातून स्पिनेटोरम ११.७% एससी ०.५ मिली किंवा पायरीडाईल १० % इसी १.३ मिली किंवा फ्लूबेंडायअमाइड २० % डब्ल्यु.जी ०.५ मिली किंवा ब्रोफ्लानिलाइड २०% एससी ०.२५ मिली किंवा आयसोसायक्लोसेरॅम १८.१ एससी ०.६ मिली किंवा क्लोरॅन्ट्रॅनिलिप्रोल १८.५० % एससी ०.४ मिली किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल ९.३०% + लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रिन ४.६०% झेडसी ०.५ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट २.२ %+ परमेथ्रीन १५.३ % ईसी १.५ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट १.५% + प्रोफेनोफोस ३५% डब्लूडीजी १.५ ग्रॅम किंवा सायन्ट्रानिलीप्रोल १६.९% + लुफेन्युरॉन १६.९ % w/w एससी ०.३ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट ५% + लुफेन्युरॉन ४० % w/w डब्लूजी ०.१६ ग्रॅम या पैकी एका कीटकनाशकाची फवारणी करावी (वरील सर्व कीटकनाशके हे फक्त मका पिकावरील अमेरिकन लष्कर अळीच्या व्यवस्थापनासाठी CBI & RC लेबल क्लेम आहेत).
- **नोट :** वरील सर्व कीटकनाशकाचे प्रमाण साध्या/ नॅपसॅक पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. फवारणीसाठी स्वच्छ पाणी वापरावे. रासायनिक किटकनाशकाची फवारणी चारा पिकावर करु नये. वरीलपैकी प्रत्येक फवारणीसाठी केवळ एकाच कीटकनाशकाची फवारणी करावी. शेतात कीटकशकांचा वापर करतांना हातमोजे, तोंडावर मास्कचा, डोळ्यावर चष्माचा वापर करावा व सुरक्षितेची योग्य ती काळजी घ्यावी.

समन्वयक अधिकारी
क्रॉपसॅप प्रकल्प तथा सहाय्यक प्राध्यापक
कीटकशास्त्र विभाग,
वनामकृवि, परभणी

समन्वयक अधिकारी
वनामकृवि, परभणी
कीटकशास्त्र विभाग,
वनामकृवि, परभणी

**प्रत :**

१. मा. संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव
२. मा. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, म.रा., पुणे यांना माहितीस्तव
३. मा. विभागीय कृषि सहसंचालक, लातूर/छ.संभाजीनगर यांना कार्यवाहीस्तव

# अमेरिकन लष्करी अळीचा (Fall Armyworm)






















